# अधिसूचना

क्रमांक : ९६/२०१८ दिनांक : २०.८.२०१८

**विषय :- नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नविन महाविद्यालये सुरु करण्यास AICTE व शासन निर्णयात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समित्यांचे अहवाल विद्वत परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत स्विकृत केल्यानुसार, स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/1 विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ चे कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

## तक्ता

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा / अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | संलग्निकरणाचा कालावधी | शासन निर्णय क्र., व दि. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | पी.आर.पोटे (पाटील) एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर ट्रस्ट, अमरावती | पी.आर.पोटे पाटील इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरींग ॲन्ड रिसर्च, कठोरा रोड, अमरावती | बी.ई.<br>१.सीव्हील इंजी.<br>२.कॉम्पुटर सायन्स ॲन्ड इंजी.<br>३.इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेली इंजी.<br>४.इलेक्ट्रीकल इंजी.<br>५.मेकॅनिकल इंजी. | <br>६०<br>६०<br><br>६०<br><br>१२०<br>६० | सत्र २०१८-१९ | क्र.टीईएम-२०१८/ प्र.क्र.९२ /ताशि-४, दि.४ जून, २०१८ |
| २. | विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती | इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी ॲन्ड रिसर्च, अंजनगांव बारी रोड, बडनेरा, अमरावती | बी.फार्म. | ६० | सत्र २०१८-१९ | क्र.टीईएम२०१८/ प्र.क्र.१९९/ ताशि-४, दि.४ जून, २०१८<br>क्र.टीईएम-२०१८/ प्र.क्र.२४४/ताशि-४, दि.२२ जून, २०१८ |
| ३. | परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्था, चिखली जि.बुलडाणा | अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी, डी.फार्म. चिखली जि.बुलडाणा | बी.फार्म. | १०० | सत्र २०१८-१९ | क्र.टीईएम-२०१८/ प्र.क्र.१९९/ताशि-४, दि.४ जून, २०१८ |
| ४. | श्री.दुर्गामाता बहुउद्देशिय क्रिडा व शैक्षणिक संस्था, दिग्रस जि.यवतमाळ | इश्वर देशमुख इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, दिग्रस जि.यवतमाळ. | बी.फार्म. | ६० | सत्र २०१८-१९ | क्र.टीईएम-२०१८/ प्र.क्र.१९९/ताशि-४, दि.४ जून, २०१८ |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

******